मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » शुक्रवार , दि. 29 मार्च 2024 | पान- 1

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

# खासदार बारणेंची उमेदवारी निश्चित

## मावळातून श्रीरंग बारणे मैदानात : डॉ. श्रीकांत शिंदे डोंबीवलीतून पुन्हा लढणार!

**पिंपरी | प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीसाठी आता अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. पण अजूनही महायुतीमधून शिंदे गटाच्या उमेदवारांची यादी जाहीर झाली नाही. अखेरीस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काही उमेदवारांच्या नावावर शिक्कामोर्तब केले आहे. शिंदे गटाची संभाव्य यादी समोर आली आहे. महायुतीमध्ये भाजपाने आधीच 18 उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. त्यानंतर राष्ट्रवादीकडून अजितदादा पवार यांनीही सुनील तटकरे यांच्या नावाची घोषणा केली आहे.

अखेरीस आता शिंदे गटातून 12 उमेदवारांची नावे निश्चित झाली आहेत. यामध्ये कल्याण डोंबिवलीमध्ये डॉ. श्रीकांत शिंदे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. तर यवतमाळ-वाशिममधून भावना गवळी आणि नाशिकमध्ये हेमंत गोडसे यांना उमेदवारी देण्याचे ठरले आहे.

दरम्यान, शिवसेनेचे माजी मंत्री विजय शिवतारे यांची वर्षा निवासस्थानी मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांसोबत बैठक पार पडली. या बैठकीत सकारात्मक चर्चा झाली. विजय शिवतारेंच्या तक्रारींचं समाधान करण्यात यश आल्याची माहिती मिळतेय. पुरंदर तालुक्यातील नागरिकांच्या समस्यांबाबत बैठकीत प्रामुख्यानं चर्चा करण्यात आली. अजित पवार आणि सुप्रिया सुळेंविरोधात बारामतीतून लढण्याची घोषणा शिवतारेंनी केली होती. मात्र शिंदे, फडणवीस आणि अजित पवारांनी शिवतारेंसोबत वर्षा निवासस्थानी चर्चा केली. शिवतारेंची समजूत घालण्यात त्यांना यश आलं. त्यामुळे अजित पवारांविरोधात शिवतारेंनी पुकारलेलं बंड आता थंड झाल्याचं स्पष्ट झालंय.



रायगडमध्ये महायुतीत अजूनही धुसफूस सुरूच आहे. मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत रायगडमधील महायुतीच्या आमदारांची समजूत काढण्यासाठी काल रात्री वर्षा बंगल्यावर बैठक झाली. त्यानंतर आमदार राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे उमेदवार सुनील तटकरे यांना पाठिंबा देणार असल्याच्या बातम्या आल्या. मात्र, भाजपनंच रायगडमधून लढावं या मागणीवर भाजप पदाधिकारी ठाम आहेत. शेकापमधून भाजपात आलेले धैर्यशील पाटीलही नाराज असल्याचं समजतंय. भाजप पदाधिकारी धैर्यशील पाटील यांच्यासह प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळेंची भेट घेणारेत. धैर्यशील पाटील यांना रायगडमधून उमेदवारी देण्याची मागणी भाजप पदाधिकारी करत आहेत. त्यामुळे रायगडमध्ये सुनील तटकरेंच्या अडचणी वाढणार आहेत. किरण सामंत यांना सिंधुदुर्ग मतदारसंघातून उमेदवारी देण्यासंदर्भात चर्चा झाली होती. मात्र आज नारायण राणेंचं नाव समोर आल्यानं अनेकांच्या भुवया उंचावल्यात. तर राणेंना उमेदवारी मिळाल्यास विनायक राऊतांशी सामना होणार आहे.

### उमेदवारांची यादी

रामटेक – राजू पारवे
बुलढाणा – प्रतापराव जाधव
यवतमाळ-वाशिम – भावना गवळी
हिंगोली – हेमंत पाटील,
कोल्हापूर – संजय मंडलिक,
हातकंणगले – धैर्यशील माने,
नाशिक- हेमंत गोडसे
मावळ -श्रीरंग बारणे
शिर्डी – सदाशिव लोखंडे
दक्षिण-मध्य मुंबई – राहुल शेवाळे
कल्याण-डोंबिवली– डॉ.श्रीकांत शिंदे

# सुनील शेळकेंची बारणेंविरोधात मवाळकीची भूमिका!

## मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांचा विरोध करणारे सुनील शेळके यांचा यू- टर्न

**पिंपरी| प्रतिनिधी**

मावळचे विद्यमान खासदार श्रीरंग बारणे यांचा विरोध करणारे सुनील शेळके यांनी यू- टर्न घेत मावळ लोकसभेत महायुतीच्या उमेदवाराचे काम करणार असल्याचे विधान केले आहे. मावळ लोकसभेची जागा आजही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला मिळावी असा दावा देखील त्यांनी केला आहे. जोपर्यंत या जागेवर अधिकृतपणे उमेदवार दिला जात नाही, तोपर्यंत आमची हीच भूमिका असणार असल्याचे देखील त्यांनी म्हटले आहे. आमदार सुनील शेळके हे पिंपरी- चिंचवडमध्ये प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

सुनील शेळके म्हणाले, मावळ लोकसभेच्या जागेवर आजही आमचा दावा आहे. ती जागा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला मिळावी असं आमचं म्हणणं आहे. महायुतीकडून अधिकृत उमेदवार जाहीर होत नाही. तोपर्यंत मी माझ्या पक्षाची भूमिका मांडणारच असं शेळके म्हणाले. पुढे ते म्हणाले, मावळ लोकसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची मोठी ताकद आहे. याकरिता आम्ही मावळ लोकसभेच्या जागेसाठी आग्रही आहोत. मात्र, अजित पवारांनी दिलेल्या आदेशाच स्वागत करून आम्ही महायुतीच्या उमेदवाराचं काम करणार असून त्याच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणार असल्याचं शेळके यांनी म्हटलं आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाबाबत गेल्या चार महिन्यापासून मी भूमिका मांडत आहे. त्यामुळे मी कुठेही यु- टर्न घेतला नाही. मी माझे कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांच्या भूमिका नेत्यांपर्यंत मांडत होतो, असंही शेळके म्हणाले

मागील काही दिवसांपासून सुनील शेळकेंनी बारणेंचं टेन्शन वाढवलं होतं. त्यांच्या उमेदवारीला वारंवार विरोध दर्शवला होता. मतदारसंघातील पक्षाच्या ताकदीवर दीड लाखाच्या लीडने निवडून येईल, असा उमेदवार मावळात आहे असेही ते म्हणाले होते. मात्र आता त्यांनी थेट य़ुटर्न घेतल्याचं दिसत आहे. आमचे सर्वेसर्वा अजित पवार आहेत. त्यांनी जी भूमिका घेतली आहे. ती भूमिकेसोबत आम्ही ठामपणाने उभे राहणार आहोत. मात्र महायुतीचा धर्म हा फक्त राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी पाळावा, असं नाही आहे. शिवसेना, भाजप यांनीदेखील युतीचा धर्म पाळला पाहिजे. हा धर्म पाळत असताना वरिष्ठ नेत्यांचा आदेश पाळून एकत्र काम केलं पाहिजे, असंही ते म्हणाले.



मावळ लोकसभेचा अधिकृत उमेदवार अजून घोषित करण्यात आला नाही आहे. मात्र जो संभाव्य उमेदवार असेल त्यांचं काम करताना मोदींना पंतप्रधान करायचं आहे, याच हेतूनं महायुतीतील सर्व नेते आणि कार्यकर्त्यांनी हातात हात घालून काम करायला पाहिजे, असंही ते म्हणाले.

# कसबा पेठेत कलम 144 लागू

## पवळे चौक ते कुंभार वेस चौक दरम्यान 144 (1) कलम लागू करण्यात आले

**पुणे | प्रतिनिधी**

पुण्यातील काही परिसरात 144 कलम लागू करण्यात आले आहे. पुण्येश्वर मंदिर आणि छोटा शेख सल्ला दर्ग्यावरुन काही दिवसांपूर्वी पुण्यात मोठा वाद झाला होता. त्यामुळं कसबा पेठेत तणाव वाढला होता. शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिस सहआयुक्त यांनी पवळे चौक ते कुंभार वेस चौक दरम्यान 144 (1) कलम लागू करण्यात आले आहे. तसंच, सध्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था बिघडू नये म्हणून हा निर्णय घेण्यात आला आहे.

सध्या राज्यात लोकसभा निवडणुकांची रणधुमाळी सुरू आहे. त्या पार्श्वभूमीवर पोलिस सहआयुक्त प्रवीण पवार यांनी जातीय तेढ निर्माण करणाऱ्या व कायदा व सुव्यवस्था बिघडवणाऱ्या कोणत्याही कारवायांना आळा घालण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यामुळं पवळे चौक ते कुंभार वेस चौक, भोई गल्ली, कागडीपुरा, कुंभारवाडा, आलोकनगर सोसायटी आणि अग्रवाल तालीमसह ठिकाणी कलम 144 लागू करण्यात आले आहे.

कलम 144 लागू करण्यात आलेल्या ठिकाणांबाहेर राहणाऱ्या व्यक्तींना वैद्यकीय आपत्कालीन परिस्थिती वगळता धार्मिक विधी किंवा पाचपेक्षा जास्त व्यक्तींना एकत्र येण्यास मनाई करण्यात आली आहे. समाजात सलोखा राखण्यासाठी या उपाययोजना राबवण्यात आल्या आहेत. धार्मिक भावना दुखावणारी किंवा आंतरगट संघर्ष भडकावणारी कोणतीही कृती किंवा वक्तव्ये रोखण्यासाठी नियम निश्चित करण्यात आले आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अफवा पसरवणे, सोशल मीडियावर



आक्षेपार्ह मजकूर पसरवणे, पूर्वपरवानगीशिवाय सार्वजनिक मेळावे घेणे, कार्यक्रमाचे आयोजन करणे, या सर्वांवर 10 एप्रिल 2024पर्यंत निर्बंध लावण्यात आले आहेत. या निर्बंधांचे उल्लंघन केल्यास भारतीय दंड संहितेच्या कलम 188नुसार कायदेशीर कारवाई केली जाईल, असं अधिकाऱ्यांनी स्पष्ट केलं आहे..

पुण्येश्वर मंदिर आणि छोटा शेख सल्ला दर्ग्याचा वाद खूप दिवसांपासून सुरू आहे. त्यामुळं आता आणखी कोणता वाद पेटू नये, यासाठी खबरदारी घेतली जात आहे. पोलिसांचा बंदोबस्तदेखील या परिसरात तैनात करण्यात आला आहे. पोलिसांनीही नियमांचे पालन करा अन्यथा कारवाई केली जाईल, असा इशारा दिला आहे.

### धडक कारवाई...

पोलीस आयुक्तांनी दोन आठवड्यांपूर्वी उत्पादन शुल्क अधिकाऱ्यांशी चर्चा केली होती. त्यांनाही अस्थापना नियम पाळतात की नाही, याची खातरजमा करून कडक अंमलबजावणी करण्यास सांगण्यात आले होते. मात्र, त्यानंतरही अनेक तक्रारी येत होत्या. यामुळे अखेर पोलीस आयुक्तांनी त्यांच्या अधिकारात सीआरपीसी १४४ नुसार आदेश काढले आहेत. या आदेशामुळे पब आणि रूफटॉप चालकांचे धाबे दणाणले आहेत. यापुढे पोलीस इतर यंत्रणांच्या कारवाईची वाट न पाहता धडक कारवाई करणार आहेत.

# शहरात तीन ठिकाणी आग

## स्वयंपाकघरातल्या आगीत आई आणि मुलगा जखमी

**पुणे | प्रतिनिधी**

पुण्यातील मुंढवा व उंड्री या भागात आगीच्या घटना घडल्या असून ग्रामध्ये दोघेजण जखमी झाले आहेत. मुंढव्यातील एका बंगल्यात स्वयंपाकघरात लागलेल्या आगीत आई आणि मुलगा जखमी झाल्याची घटना घडली शहरात तीन ठिकाणी आग लागल्याची घटना बुधवारी घडली. मुंढव्यातील एका बंगल्यात स्वयंपाकघरात लागलेल्या आगीत आई आणि मुलगा जखमी झाल्याची घटना घडली. मुंढव्यातील झगडे पार्क परिसरात संकल्प बंगल्यात दुपारी आग लागली. आगीत अंजली इश्वर सकट (वय ५८) आणि त्यांचा मुलगा जतिन (वय ३२) जखमी झाले. बंगल्यात आग लागल्याची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेतली. स्वयंपाकघरातील गॅस सिलिंडरमधून गळती होत असल्याचे आढळून आले. जवानांनी तातडीने आग आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न सुरू केले. आगीत स्वयंपाकघरातील साहित्य जळाले.



आगीत अंजली आणि त्यांचा मुलगा जतिन जखमी झाले. जवानांनी तातडीने त्यांना रुग्णालयात दाखल केले. अग्निशमन अधिकारी प्रमोद सोनवणे, शौकत शेख तांडेल रणदिवे, जगताप, बिचकुले, कवडे, कांबळे यांनी पाण्याचा मारा करुन आग आटोक्यात आणली.

उंड्री येथील होले वस्ती परिसरात बुधवारी सकाळी आठच्या सुमारास एका भंगार माल दुकानाला आग लागली. आगीत भंगार माल जळाले. अग्निशमन दलाच्या जवानांनी अर्धा तासात आग आटोक्यात आणली. अग्निशमन अधिकारी कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली दहा जवानांनी आग आटोक्यात आणली. घोरपडीतील बी. टी. कवडे रस्त्यावर सोलेस पार्क सोसायटीत रोहित्राला आग लागली. जवानांनी पाण्याचा मारा करुन आग आटोक्यात आणली.

### खेड शिवापूर परिसरात कंपनीत आग

खेडशिवापूर परिसरात एका रंगाच्या कंपनीत आग लागल्याची घटना घडली. पीएमआरडीएच्या अग्निशमन दलाच्या जवानांनी आग आटोक्यात आणली. सुदैवाने या घटनेत कोणी जखमी झाले नाही.

# स्थानकांच्या नावातून मेट्रो मालामाल!

## मेट्रो स्थानकांच्या नावातून उत्पान्नाचा अनोखा मार्ग

**पुणे | प्रतिनिधी**

मेट्रो स्थानकांच्या नावातून उत्पन्न मिळविण्याचा अनोखा मार्ग महामेट्रोने शोधला आहे. सध्या सहा मेट्रो स्थानकांच्या नावात कंपन्यासह इतर संस्थांच्या नावाचा समावेश करण्यात आला आहे. यामुळे महामेट्रोला या प्रत्येक स्थानकातून सुमारे ५५ ते ७२ लाख रुपयांचे उत्पन्न मिळत आहे. महामेट्रोच्या दोन्ही मार्गिकांवर अनेक कंपन्या आणि व्यावसायिक संस्था आहेत. त्यामुळे महामेट्रोने या संस्थांचा वापर मेट्रो स्थानकांच्या नावात जाहिरातीप्रमाणे करण्यास सुरुवात केली आहे. सध्या मेट्रो मार्गिका एकवरील फुगेवाडी आणि मेट्रो मार्गिका दोनवरील नळ स्टॉप, गरवारे महाविद्यालय, पुणे रेल्वे स्थानक, रूबी हॉल आणि कल्याणी नगर या स्थानकांच्या नावात कंपन्या आणि व्यावसायिक संस्थांच्या नावाचा समावेश करण्यात आला आहे. स्थानकाच्या प्रवेशद्वारावर या कंपन्यांचे नाव दर्शनी भागात देण्यात आले आहे. या माध्यमातून महामेट्रो एका स्थानकातून वर्षाला



५५ ते ७२ लाख रुपये मिळवत आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली.

जिल्हा न्यायालय ते स्वारगेट या मेट्रो मार्गाचे काम अद्याप पूर्ण झालेले नाही. या मार्गावरील मंडई, बुधवार पेठ या स्थानकांमध्येही नावांचा जाहिरातीप्रमाणे वापर करण्यात येणार आहे. याचबरोबर सध्या काम सुरू असलेल्या खडकी आणि येरवडा मेट्रो स्थानकातही आगामी काळात नावांचा जाहिरातीसाठी वापर केला जाणार आहे. बिगरप्रवासी उत्पन्नाचे विविध स्त्रोत महामेट्रोकडून शोधले जात आहेत. त्यातून बिगरप्रवासी उत्पन्नाचा वाटा एकूण उत्पन्नात वाढावा यासाठी पावले उचलली जात आहेत, असेही सूत्रांनी स्पष्ट केले.

### बिगरप्रवासी उत्पन्नावर भर

महामेट्रो ही सार्वजनिक वाहतूक व्यवस्था असल्याने प्रवाशांसाठी तिकिटांचे दर कमी ठेवावे लागतात. यामुळे प्रवासी वाहतुकीतून मिळणारे उत्पन्नही कमी आहे. यातून मार्ग काढण्यासाठी बिगरप्रवासी उत्पन्नावर महामेट्रोकडून भर दिला जात आहे. यात स्थानकांमधील जाहिरातीसह मेट्रो गाड्यांवर जाहिराती केल्या जाणार आहेत. त्यातून बिगरप्रवासी उत्पन्न वाढविण्याचा प्रयत्न असल्याचे सूत्रांनी सांगितले.

# कर संकलन कार्यालये रात्री 9 पर्यंत सुरू

## सुट्टीच्या तीनही दिवशी सर्व कर संकलन कार्यालये राहणार सुरू : 3 दिवसात 90 कोटींचे आव्हान

**पिंपरी | प्रतिनिधी**

कर संकलन व कर आकारणी विभागाच्या वतीने कर वसुलीचे 1 हजार कोटींचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी विविध प्रकारचे प्रयत्न केले जात आहेत. उद्या (शुक्रवार) पासून महापालिकेला तीन दिवस सुट्टी आहे. मात्र, या तिन्ही दिवसात सकाळी साडेनऊ ते रात्री नऊ वाजेपर्यंत नागरिकांना कर भरता यावा, यासाठी कॅश काऊंटर सुरू ठेवण्याचा महत्वपूर्ण निर्णय महापालिकेने घेतला आहे. तसेच सध्या महापालिका तिजोरीत 910 कोटींचा महसूल जमा झाला असताना शेवटच्या तीन दिवसात 90 कोटी वसूल करण्याचे आव्हान कर संकलन विभागापुढे असणार आहे.

पिंपरी-चिंचवड शहरात मालमत्ता धारकांना कर भरण्यासाठी 17 विभागीय कार्यालये आणि ऑनलाइनची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. आत्तापर्यंत 910 कोटी रुपयांचा कर महापालिका तिजोरीत जमा झाला आहे. 1 हजार कोटी रुपयांचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी कर संकलन विभागाच्या वतीने थकबाकीदारांच्या मालमत्ता जप्त करणे, वर्तमान पत्रात नावे प्रसिद्ध करणे, नळ कनेक्शन खंडित करणे, जप्त मालमत्तांचा लिलाव करणे, यासारख्या कठोर कारवाया केल्या जात आहेत. त्यामुळेच सातत्याने कराचा भरणा वाढला आहे.

नागरिकांना कर भरण्यासाठी कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी कर संकलन विभागाच्या वतीने विशेष खबरदारी घेतली आहे. उद्या शुक्रवारी गुड फ्रायडे आणि शनिवार, रविवार महापालिकेला शासकीय सुट्टी आहे. मात्र, या तिन्ही दिवशी नागरिकांच्या सोयीसाठी कर संकलन कार्यालये सकाळी साडेनऊ ते रात्री नऊ वाजेपर्यंत कॅश काऊंटरवर मालमत्ता कराचा भरणा स्विकारला जाणार आहे, याचा नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन सहाय्यक आयुक्त नीलेश देशमुख यांनी केले आहे.




गेल्या अनेक वर्षातील आत्तापर्यंत सर्वाधिक म्हणजे तब्बल 76 कोटींची पाणीपट्टीची वसुली झाली आहे. मात्र, त्यानंतरही पाणीपट्टी मोठ्या प्रमाणात थकीत आहे. तसेच आगामी आर्थिक वर्षातही मिळकत कर आणि पाणीपट्टी थकीत असणाऱ्यांचे नळ कनेक्शन खंडीत करण्यात येणार आहे. त्यामुळे ही निरंतर कारवाई टाळण्यासाठी थकबाकीदारांनी 31 मार्चपूर्वी पाणीपट्टी, मालमत्ता कर भरून महापालिकेला सहकार्य करावे.

**- प्रदीप जांभळे-पाटील, अतिरिक्त आयुक्त.**

शहरातील निवासी मालमत्ता धारकांकडे मोठ्या प्रमाणात थकबाकी आहे. मात्र, ज्या थकबाकीदारांची आर्थिक क्षमता नाही, त्यांनी टप्पा-टप्प्याने जेवढा शक्य आहे तेवढा कर भरावा. जेणेकरून विलंब शुल्काची रक्कम दिवसेंदिवस वाढणारी कमी होईल. कर थकीत ठेवणे हे नागरिकांच्या दृष्टीने आर्थिक हिताचे नाही. थकीत कर भरणे हे नागरिकांच्याच फायद्याचे आहे.

**– नीलेश देशमुख, सहायक आयुक्त, कर आकारणी व कर संकलन विभाग**

### असा आला रूपया

ऑनलाईन- 513 कोटी 58 लाख
रोख- 131 कोटी 24 लाख
धनादेशाद्वारे-147 कोटी 17 लाख
इडीसी- 12 कोटी 93 लाख
आरटीजीएस-43 कोटी 20 लाख
डीडी- 8 कोटी 12 लाख
विविध ॲप- 6 कोटी 93 लाख
इनइफ्टी - 6 कोटी 83 लाख

### कर भरणाऱ्या मालमत्तांची आकडेवारी

औद्योगिक – 4 हजार 395
निवासी- 4 लाख 26, 530
बिगरनिवासी – 44 हजार 554
मिश्र- 12 हजार 432
मोकळ्या जमिन - 4 हजार 416
इतर – 5
एकूण 4 लाख 92 हजार 422

शहरात कर संकलनासाठी महापालिकेचे 17 झोन आहेत. यामध्ये वाकड झोनमध्ये सर्वाधिक म्हणजे 65 हजार मालमत्ता धारकांनी 148 कोटी रुपयांचा कर जमा केला आहे.

# नदीपात्रात भराव टाकणाऱ्यावर कारवाई

## नऊ वाहने पकडून 1 लाख 15 हजार रुपयांचा दंड वसूल : मोठ्या प्रमाणात हवा प्रदूषण

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड शहरातील विविध भागांमधून वाहणाऱ्या नद्यांच्या कडेला तसेच नद्यांमध्ये राडारोडा टाकणारी वाहने आणि वाहनचालक यांच्यावर महापालिकेच्या पर्यावरण विभागाने दंडात्मक कारवाई केली आहे.

पिंपरी चिंचवड शहरातून मुळा, पवना आणि इंद्रायणी नद्या वाहतात. या नद्यांच्या कडेला राडारोडा टाकत असल्याच्या तक्रारी महापालिकेला प्राप्त झाल्या होत्या. या तक्रारींची दखल घेत महापालिकेच्या पर्यावरण विभागाने प्रत्यक्ष पाहणी करुन सापळा रचून सबंधित सर्व वाहनचालकांवर आणि वाहनांवर कारवाई केली आहे.

शहरातील विविध भागांत दररोज ट्रक, ट्रॅक्टर, डंपर, टेम्पो तसेच आर.एम.सी.प्लॅन्टच्या मिक्सर गाड्या अशा वाहनांतून नदीच्या कडेला राडारोडा टाकण्यात येत होता. यामध्ये वाहनचालक शिवा राठोड (वाहन क्र.के.ए.३३/टी.बी.२३२२), उमेश बारणे (वाहन क्र.एम.एच.१४/जे.एल.९०८५), वेदांत देसाई (वाहन क्र. के.ए.३३/के.ए.२१०५), आर.डी.वाघोले (वाहन क्र.एम.एच.१४/डी.एम.६४३२, एम.एच.१२/टी.एल.०८७२), तेजस उक्के (वाहन क्र.एम.एच.२०/सी.आर.२१९१,/एम.एच.१४/एल.ए.८३२८), प्रकाश चौधरी (वाहन क्र. एम.एच.१२/क्यु.डब्ल्यु.११४१), कांतीलाल खिरु पवार (वाहन क्र. एम.एच.१४/बी.एम.९८२) अशी एकूण ९ वाहने पकडून त्यांच्याकडून सुमारे १ लाख १५ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.

आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या निर्देशानुसार, पर्यावरण विभागाचे सहशहर अभियंता संजय कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य निरीक्षक अमोल गोरखे यांच्यासह गोरक्षनाथ करपे, स्वप्निल पाटील, पुष्पराज भागवत, प्रदीप महाले, जगन्नाथ काटे, बाबासाहेब ढोकळे तसेच महाराष्ट्र सुरक्षा दल, मेस्को जवानांच्या पथकाने ही कारवाई केली आहे. नदीपात्रात भराव टाकल्यामुळे नदीपात्र अरूंद होत असून तसेच नदीप्रदूषण देखील होत आहे. त्यामुळे यापुढे नदीपात्रात भराव टाकणाऱ्यांवर तातडीने कायदेशीर कारवाई करण्यात येईल. या कारवाईसाठी महापालिकेच्या पर्यावरण विभागाच्या वतीने स्वतंत्र पथकांची नेमणूक करण्यात आली आहे.

नदीमध्ये भराव टाकणाऱ्या जागामालक, गाडी मालक, वाहन चालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात येईल. तसेच वाहनेही जप्त करण्यात येतील, याची नोंद सबंधितांनी घ्यावी, असे आवाहन महापालिकेच्या पर्यावरण अभियांत्रिकी विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.



“नदीपात्रात भराव टाकल्यामुळे नदीपात्र अरूंद होत असून तसेच नदीप्रदूषण देखील होत आहे. त्यामुळे यापुढे नदीपात्रात भराव टाकणाऱ्यांवर तातडीने कायदेशीर कारवाई करण्यात येईल. या कारवाईसाठी महापालिकेच्या पर्यावरण विभागाच्या वतीने स्वतंत्र पथकांची नेमणूक करण्यात आली आहे. नदीमध्ये भराव टाकणाऱ्या जागामालक, गाडी मालक, वाहन चालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात येईल. तसेच वाहनेही जप्त करण्यात येतील, याची नोंद सबंधितांनी घ्यावी.

**- संजय कुलकर्णी (सह शहर अभियंता, महापालिकेच्या पर्यावरण अभियांत्रिकी विभाग)**

# पुण्याच्या धरणांमध्ये दोन महिने पुरेल एवढाच पाणीसाठा

## जिल्ह्यातील 26 धरणांमध्ये 56.31 टीएमसी उपयुक्त पाणीसाठा शिल्लक : पुरंदर तालुक्यातील नाझरे धरण कोरडे

**पुणे | प्रतिनिधी**

जिल्ह्यातील २६ धरणांमध्ये मिळून आजअखेरपर्यंत (ता. २७) ५६.३१ टीएमसी उपयुक्त पाणीसाठा शिल्लक आहे. सध्याच्या उपयुक्त पाणीसाठ्याचे हे प्रमाण एकूण साठ्याच्या तुलनेत केवळ २८.३९ टक्के इतके अल्प आहे. हा उपलब्ध साठा गेल्या वर्षीच्या आजच्या तारखेच्या तुलनेत ३८.८८ टीएमसीने कमी आहे. पुरंदर तालुक्यातील नाझरे धरण कोरडे पडले असून उजनीतील उपयुक्त साठा शून्याच्या खाली गेला आहे. आतापर्यंत उजनीतील अचल (मृतसाठा) साठ्यातील १९.११ टीएमसी पाणी वापरले आहे.



गेल्या वर्षीच्या आजच्या तारखेला जिल्ह्यातील धरणांमध्ये एकूण ९५.१९ टीएमसी इतका पाणीसाठा उपलब्ध होता. गेल्या वर्षीच्या उपलब्ध पाणीसाठ्याचे प्रमाण हे ४७.९९ टक्के इतके होते. त्यामुळे यंदाचा आजअखेरचा उपलब्ध पाणीसाठा हा गेल्या वर्षीच्या तुलनेत १९.६० टक्क्यांनी कमी झाला आहे. या २६ धरणांव्यतिरिक्त टाटा समूहाच्या सहा धरणांमधील साठा वेगळा आहे. जिल्ह्यात एकूण ३२ धरणे आहेत. यापैकी सहा धरणे टाटा समूहाची व उर्वरित २६ धरणे आहेत.

जिल्ह्यातील धरणांमध्ये उजनी, भामा आसखेड, माणिकडोह, चासकमान, पवना, मुळशी, टेमघर, वरसगाव, पानशेत, गुंजवणी, नीरा देवधर, भाटघर, वीर आदी प्रमुख धरणांचा समावेश आहे. सर्व प्रमुख धरणांसह जिल्ह्यातील सर्व धरणांतील मिळून एकूण उपयुक्त पाणीसाठा क्षमता १९८.३४ टीएमसी इतकी आहे.

### 'टाटां'च्या धरणांत २१.९० टीएमसी पाणी

टाटा उद्योग समूहाच्या धरणांमध्ये मुळशी, ठोकळवाडी, शिरोटा, वळवण, लोणावळा आणि कुंडली यांचा समावेश आहे. या सहा धरणांची एकूण साठवण क्षमता ४२.७६ टीएमसी आहे. यापैकी सध्या २१.९० टीएमसी (५१.२१ टक्के) उपयुक्त पाणीसाठा शिल्लक आहे.

| प्रमुख धरणांमधील बुधवारचा साठा | (टीएमसीमध्ये) |
|---|---|
| टेमघर | ०.३३ |
| वरसगाव | ६.६४ |
| पानशेत | ४.९६ |
| खडकवासला | १.०८ |
| पवना | ३.९९ |
| चासकमान | २.६८ |
| भामा आसखेड | ३.६५ |
| आंद्रा | १.६४ |
| गुंजवणी | १.६६ |
| नीरा देवघर | ४.२७ |
| वीर | ४.२५ |
| माणिकडोह | १.०९ |
| येडगाव | ०.८९ |
| डिंभे | ५.२४ |
| **'टाटां'च्या धरणांतील पाणीसाठा** | **(टीएमसीमध्ये)** |
| मुळशी | ९.१९ |
| ठोकळवाडी | ६.९७ |
| शिरोटा | ४.२५ |
| वळवण | १.३४ |
| कुंडली | ०.१५ |

# अमोल कोल्हेंचा आढळराव पाटलांना वाकून नमस्कार!

## वयस्कर व्यक्तीला वाकून नमस्कार करणे ही संस्कृती : महाराष्ट्राच्या संस्कृतीचं दर्शन

**पुणे | प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज यांची आज तिथीनुसार जयंती आहे. त्यामुळे अनेक शिवभक्त किल्ले शिवनेरीवर जात छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन करतात. राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे नेते अमोल कोल्हे आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते शिवाजीराव आढळराव पाटील यांनी देखील किल्ले शिवनेरीवर जात महाराजांना अभिवादन केलं.

यावेळी हे दोन्ही नेते समोरासमोर आले. यावेळी दोघांमध्ये काहीवेळासाठी बातचितही झाली. यावेळी अमोल कोल्हे यांनी आढळराव पाटलांना वाकून नमस्कार केला. आज शिवरायांची जयंती आहे. त्यांना विनम्र अभिवादन करतो. त्यांच्यासमोर नतमस्तक होण्यासाठी मी शिवनेरीवर आलो आहे, असं अमोल कोल्हे यावेळी म्हणाले.

दिल्लीच्या तख्तासमोर न झुकण्याची आणि स्वाभिमान गहाण ठेवायचा नाही. ही प्रेरणा किल्ले शिवनेरीवर मिळते. कोणत्याही मंदिरात जाण्याआधी पहिले नतमस्तक झालो. तो शिवनेरी किल्ल्याच्या पहिल्या पायरीवर... पहिला पायरीचे दर्शन घेतल्यानंतर संघर्षाची प्रेरणा स्वाभिमानाची प्रेरणा मिळते. लढण्यासाठी ताकद द्या. सर्वसामान्य नागरिकांसाठी लढण्याची प्रेरणा द्या. हेच आज शिवनेरीवर नतमस्तक होताना मागणं मागितलं, असं अमोल कोल्हे म्हणाले.

त्यांची एक जरी वारी आढळरावांनी दिल्लीला कांदा उत्पादक शेतकऱ्यांसाठी झाली असती तर समाधान वाटलं असतं. आक्रोश मोर्चाची त्यांची टिंगल त्यांनी केली नसती तर बरं वाटलं असतं. धोरणात्मक टीका व्हायला हवी. वैयक्तिक टीका, व्यावसायिक कामाविषयी की टीका करणार नाही. पण धोरणात्मक टीका होणारच आहे. समोरासमोर बसून चर्चा करु पाच वर्षात मी काय केलं यावर बोलू... 2019 ची निवडणूक मी शरदचंद्र पवार यांच्या आशीर्वादाने केली आणि आताही तेच करतोय. माझ्या भूमिकेत कुठं बदल झालाय. शिरूरसह इतर मतदारसंघात ही मला लक्ष देता येतंय, असं अमोल कोल्हे म्हणाले.



अनेक वर्षापासून तारखेनुसार आणि तिचे नुसार शिवजयंतीला मी शिवनेरीवर येण्याचा प्रयत्न करत असतो. मी आज शिवनेरीच्या पहिल्या पायरीला नतमस्तक होऊन माझ्या प्रचाराची सभा प्रचाराची सुरुवात केली आहे. या पुढचं आयुष्य माझं शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी शेतीमालाला बाजारभाव मिळण्यासाठी त्याचप्रमाणे कांद्याला बाजार भाव आणि दुधाला बाजार भाव देण्यासाठी मी कटिबद्ध असणार आहे. नौटंकी मी करत नाही. मी शेतकरी कुटुंबातील माणूस असल्याने मला शेतकऱ्यांच्या वेदना माहिती आहेत. त्यांच्यासाठी मी सध्या काम करतो आहे, असं शिवाजीराव आढळराव पाटील म्हणाले.